**गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर एमसीएचआय - क्रेडाईच्या रिअल इस्टेट आणि हाऊसिंग फायनान्स एक्झिबिशनच्या 26 व्या आवृत्तीचे उद्घाटन**

***एमसीएचआय - क्रेडाई प्रदर्शनामध्ये आपल्याला हजारहून अधिक प्रकारच्या मालमत्ता, शंभरहून अधिक मोठे विकासक, 75 हजारपेक्षा अधिक खरेदीदारांच्या अपेक्षा पूर्ण करणा-या 15हून अधिक बँका आपल्या भेटीसाठी येणार आहेत. त्यामुळे आपल्याला या पदर्शनामध्ये 'ना भूतो न भविष्यती असा अनुभव आल्याशिवाय राहणार नाही. विशेष म्हणजे या प्रदर्शनामध्ये housing.com या ऑनलाइन रिअल्टी पोर्टलने तिस-यांदा भागिदार करून हॅटट्रिक मारली आहे.***

**मुंबई 7 एप्रिल 2016: वेगवेगळ्या प्रकारची मालमत्ता खरेदी करणा-या ग्राहकांना एकाच छताखाली आणणारे एमसीएचआय - क्रेडाईचे 26 वे प्रॉपर्टी एक्सिबिशन - 2016चे, वांद्रे कुर्ला संकुल, एमएमआरडीए मैदानामध्ये मोठ्या उत्साहात उद्घाटन करण्यात येत आहे. या भव्य प्रदर्शनाचे उद्घाटन श्री दिपांकर बोस, मुख्य व्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ इंडियायांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने करण्यात येणार आहे.**

**"गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर घर घेणे उत्तम असते" या ग्राहकांच्या भावनांकडे सकारात्मकरित्या विचार करून एमसीएचआय - क्रेडाईने या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. यामुळे हा एक्स्पो गृहखरेदीदारांसाठी एका अर्थाने आनंदाची पर्वणीच ठरणार आहे.**

**गृह निर्माण क्षेत्रासाठी आगामी वर्ष फलदायी ठरणार आहे असा अंदाज बांधला जात आहे. गृह निर्माण विधेयकाची मंजूरी, मध्यवर्ती बँकेने रेपो रेटमध्ये केलेली कपात, केंद्रीय अर्थसंकल्प - 2016 मध्ये जाहीर करण्यात आलेल्या विविध योजना यामध्ये खासकरून स्वस्त घरांना देण्यात आलेली चालना, अशाप्रकारे सरकारकडून उचलण्यात आलेल्या सकारात्मक पावलांमुळे मालमत्ता खरेदीदार आणि उद्योग जगतामध्ये आशादायी भावना निर्माण झाली आहे. या सकारात्मक वातावरणाचा फायदा गृहखरेदीदारांपर्यंत पोहचवण्यासाठी एमसीएचआय - क्रेडाईच्या या प्रदर्शनामध्ये विविध प्रकारच्या आश्चर्यकारक आणि आकर्षक सवलती देण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला जाणार आहे.**

**यंदाच्या आवृत्तीची संकल्पना "आताच आपले घर विकत घ्या " अशी आहे. त्यामुळे या प्रदर्शनामध्ये मालमत्ता खरेदीदारांना वेगवेगळ्या प्रकारच्या संधींचा लाभ घेण्यास उत्तेजन मिळेल. गेल्या 15 वर्षांच्या कालावधीमध्ये एमसीएचआय - क्रेडाई मालमत्ता प्रदर्शनाच्या 25 आवृत्ती पूर्ण झाल्या. या कालावधीत, अनेक गुंतवणूकदारांनी एमसीएचआय - क्रेडाई मालमत्ता प्रदर्शनाला भेट दिल्यानंतर त्यांना त्यांच्या स्वप्नातील घर मिळाले आहे. एमसीएचआय-क्रेडाईच्या 25 व्या रौप्य महोत्सवी आवृत्तीने ऑक्टोबर 2015मध्ये भरघोस यश संपादित केलेले आहे.**

**या मालमत्ता प्रदर्शनाच्या 26व्या आवृत्तीची सुरूवात झाल्याची घोषणा करतांना श्री. धर्मेश जैन, अध्यक्ष,एमसीएचआय - क्रेडाईयांनी आपले विचार व्यक्त करतांना सांगितले, "एमसीएचआय-क्रेडाई प्रदर्शनाची 26वी आवृत्ती ही बाजारातील सकारात्मक आणि उमेदीपणाचा करण्यात आलेला उत्सव आहे. तसेच 25व्या आवृत्तीतीमध्ये मिळालेल्या यशाचा एक करार आहे . या प्रदर्शनामध्ये सहभागी झालेल्या गृह निर्माण उद्योगातील सर्वांना उत्तम फळ मिळावे असा आमचा प्रयत्न आहे. या प्रदर्शनाच्या मुख्य पाऊल खूणा म्हणजे**

ख-या अर्थाने आंतरराष्ट्रीय उपस्थिती आहे. अशा कमी भारतीय कंपन्या आहेत ज्या आंतरराष्ट्रीय समुदायांसमोर भारतीय मालमत्ता आणतात. "

या प्रसंगी बोलताना श्री. तेजस व्यास, अध्यक्ष, प्रदर्शन समिती, एमसीएचआय-क्रेडाईम्हणाले, "एमसीएचआय-क्रेडाई मालमत्ता प्रदर्शनाने केवळ उद्योग जगताला मोठे उत्तेजन मिळणार नाही तर विकासक आणि ग्राहकांना एकाच छताखाली एकत्रपणे मोठ्याप्रमाणात समोरा समोर येण्यासाठी व्यासपीठ लाभणार आहे. आणि दरवर्षी याचे प्रमाण वाढतच जाणार आहे. एक संघटना म्हणून खरेदीदार आणि विक्रेते योग्य पद्धतीने सहजरित्या एकमेकांना भेटतील आणि एक विश्वासार्ह व्यासपीठ निर्माण होईल असे आमचे ध्येय आहे . गुढीपाडव्याच्या सणानिमित्ताने आयोजित चार दिवसाच्या या प्रदर्शनामध्ये नवीन गृहखरेदीला प्रोत्साहन मिळेल. ग्राहकांची खरेदी अधिक रोमांचकारक होण्यासाठी विकासकांनी वेगवेगळ्या सवलती जाहीर केल्या आहेत. त्यामुळे प्रत्येकाचा गृहखरेदीचा अनुभव नक्कीच द्विगुणित होणार आहे. "

यंदाच्या मालमत्ता प्रदर्शनाच्या 26 व्या आवृत्तीमध्ये धोरणात्मक भागीदार असलेल्या Housing.com ने ऑनलाईन प्लॅटफॉर्म आणि ग्राऊंड एक्टिव्हेशन या दोन्ही प्रकारामध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. आणि गृह खरेदीदारांनी कधी विचारही केला नसेल अशा विविध ऑफर्स देत आहेत. श्री. अमित भसीन, हेड स्ट्रॅटेजिक बिझनेस, Housing.com यांनी आपली प्रतिक्रिया देतांना सांगितले की, "आम्ही MCHI बरोबर पहिल्यांदा जेव्हा सहभागी झालो तेव्हा आमचा अनुभव उत्तम होता. यंदाच्या एक्स्पोच्या आवृत्तीमध्ये आम्ही सहभागी विकासकांना आणखी कसा फायदा होईल या दृष्टीने लक्षपूर्वक काम केलेले आहे. आणि महत्वाचे म्हणजे गृखरेदीदारांना आश्चर्यकाकर ऑफर्सबरोबरच अधिक पारदर्शक आणि साधा सोपा अनुभव मिळावा याकडे विशेष लक्ष दिलेले आहे. "

हे प्रदर्शन 7 एप्रिल व 8 एप्रिल रोजी सकाळी 10 ते संध्याकाळी 8 वाजेपर्यंत आणि 9 व 10 एप्रिल 2016 रोजी सकाळी 11 ते रात्री 9 वाजेपर्यंत एमएमआरडीए मैदान, बीकेसी, मुंबई येथे खुले आहे.

**महाराष्ट्र चेम्बर्स ऑफ हाऊसिंग इंडस्ट्री (एमसीएचआय-क्रेडाई)(www.mchi.net)**

महाराष्ट्र चेम्बर्स ऑफ हाऊसिंग इंडस्ट्री (एमसीएचआय-क्रेडाई) ची स्थापना 1982मध्ये झाली असून ही मुंबई आणि एमएमआर क्षेत्रातील सर्वात प्रसिद्ध आणि एकमेव मान्यताप्राप्त बांधकाम व्यावसायिक संघटना आहे. एमसीएचआय-क्रेडाईतर्फे रिअल इस्टेट डेव्हलपमेंटशी निगडीत सदस्य एकाच व्यासपीठावर एकत्र येतील आणि इंडस्ट्रीसमोर असलेल्या समस्या मांडतील. या मंडळाकडे मुंबईतील अग्रगण्य अशा 1800 विकासकांचे सदस्यत्व आहे. एमसीएचआय-क्रेडाईचा विस्तार एमएमआर परिसरापर्यंत झालेला असून त्यांची ठाणे, कल्याण-डोंबिवली मीरा-वसई शहर, रायगड आणि नवी मुंबई अशी युनिट आहेत. एमसीएचआय-क्रेडाई हे महाराष्ट्र शासन आणि केंद्र सरकार मान्यताप्राप्त संघटना असून ते गृहपुरवठा मागणीला हातभार लावतात. घर ही प्रत्येकाची मुलभूत गरज आहे.

एमसीएचआय-क्रेडाई आपल्या सभासदांना आणि समाजाला मोठ्याप्रमाणामध्ये सर्वोत्तम सेवा देण्यासाठी झटत असते. रिअल इस्टेट आणि हाऊसिंग क्षेत्राच्या वृद्धीची शाश्वती देण्यासाठी ही संस्था समर्पित आहे, ज्यामुळे प्रत्येक भारतीय नागरिकाचे जीवन समृद्ध होते आणि भारताच्या एकंदरीत विकासाला फार मोठा हातभार लागतो.

**हाऊसिंग.कॉम (Housing.com) बद्दल**

2012मध्ये प्रस्थापित झालेली हाऊसिंग.कॉम भारतातील आघाडीच्या ऑनलाइन इस्टेट मंचापैकी एक असून सद्यस्थितीपर्यंत 1.7 लाख तपासणी केलेली घरे आणि अद्वितीय ऑनलाईन युजर अनुभव देणारी ही एक अग्रेसर संस्था आहे. ही कंपनी म्हणजे रिअल इस्टेट पार्श्वभूमीवर तांत्रिकदृष्ट्या नवीनीकरण आहे, ज्यामार्फत भारतातील रिअल इस्टेट वातावरणामध्ये अधिक प्रमाणामध्ये पारदर्शकता, सक्षमता आणि विश्वास आणण्याचा विस्तिर्ण दृष्टीकोन ठेवला गेला आहे.

हाऊसिंग.कॉम (Housing.com) ही सूचीबद्ध केल्या गेलेल्या प्रत्येक घराची प्रशुक्षुत इ्टी संग्राहक समघ, समिक्षक, ल्खीपरिक्षक ईणि फेटेग्राफर्स यांनी एकत्रित येऊन केलेल्या स्वतंत्र तपासणीची मुभा देणारी एकमेव कंपनी आहे. प्रति लिस्टिंगमध्ये 120 पेक्षा जास्त डेटा पॉइंट्स सोबत इनहाऊस डेटा सायन्स लॅब एका महत्वपूर्ण माहिती माध्यमाने सक्षम झाली आहे, ज्याद्वारे ग्राहकांना आणि विक्रेत्यांना अधिक प्रमाणामध्ये सूचित निर्णय घेण्यासाठी माहिती पुरविली जाते. हाऊसिंग फायनान्स.कॉम भारताच्या रियल इस्टेट आव्हानांना सोडविण्यासाठी 360 अंश दृष्टीकोन बाळगण्याबद्दल महत्वाकांक्षी आहे.

हाऊसिंग.कॉम (Housing.com) ने अनेक धोरणात्मक अधिपत्यांना मार्गी लावले आहे. उदा. घरांच्या खरेदी विक्रीसाठीभारताचा सर्वात सामाजिक मंच (इंडियन रिअल इस्टेट फोरम), एक संस्थापित कंपनी जी नवीन रियल इस्टेट प्रकल्पांच्या (रियल्टी बिझनेस इंटिलिजन्स) वेळेवर केल्या जाणा-या परिश्रमांवर लक्ष केंद्रित करते तसेच विकासकांसाठी एका प्रसिद्ध सॉफ्टवेअर ज्यामुळे त्यांच्या विपणन आणि विक्रीच्या परिश्रमांची व्यवस्थापन आणि सुधारणा होते.(होम बाय 360).

हाऊसिंग.कॉम (Housing.com) ने 100 लाख डॉलरपेक्षा जास्त भांडवलाची भारताच्या आघाडीच्या गुंतवणूकदारांकडून उभारणी केली असून त्यात सॉफ्ट बँक, नेक्सस वेंचर, फाल्कन एज, हेलियन वेंचर्स, निर्वाणा वेंचर्स, क्वालकॉम, डीएसटी फाऊंडर युरी मिलनेर, वायाकॉम 18 सहसंस्थापक हरेश चावला, स्नॅपडील संस्थापक कुणाल भाल आणि रोहित बंसल यांचा समावेश आहे.

For further details contact:
Bienu M Vaghela, Head – PR, MCHI – CREDAI, bienu@mchi.net +9167141962
Bhagyashree A Khedkar PR-Executive, MCHI – CREDAI, bhagyshree@mchi.net , +919833189357